पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १७२**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २०/०५/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.२०/०५/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.पाटील – अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.चितळे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.तांबे, मा.कुलकर्णी – कार्यकारी अभियंता, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले**

विषय क्र.१६) लॉकडाऊनच्या काळात अतिक्रमण विभागामार्फत आकारण्यात येणा-या दंडाबाबत – मा.शितल शिंदे, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१७) जागा भाड्याने देणेबाबत. – मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१८) पिं.चिं.म.न.पा. हद्दीतील नियोजित मैलाशुध्दीकरण केंद्र चे DPR तयार करणे व निविदा काढणेकामी सल्लागार (Consultant) नेमणेबाबत. – मा.सुवर्णा बुर्डे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिराचे नुतनीकरणाचे काम करणे (निविदा नोटिस क्र.५०/५/२०१७-१८) या कामातील वाढीव र.रू.४५,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत. – मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८८/३/२०१८-१९ अन्वये कासारवाडी जलतरणतलावास संरक्षण भिंत बांधणे व रस्ता विकसित करणेस मान्यता मिळणेबाबत. - मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२१) ड क्षेत्रिय विद्युत कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२५ येथे तात्पुरत्या स्वरूपात कर्मचारी नियुक्त करणेबाबत. – मा.शितल शिंदे, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२२) विविध संस्थांकड्न, चॅरिटीमधून अन्नधान्याचे कीट वाटपाबाबत. – मा.आरती चोंधे, मा.झामाबाई बारणे यांचा प्रस्ताव

----------

अ) दिनांक ०४/०५/२०२० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १३/०५/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १७१) सभावृत्तांत कायम आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७०८७ विषय क्रमांक – १

दिनांक – २०/०५/२०२० विभाग – पाणीपुरवठा फ क्षेत्रीय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/पापु/०५/कावि/१०/२०२०, दि.२३/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे “फ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत कृष्णानगर व इतर ठिकाणी व्हॉल्व्ह ऑपरेशनकरीता मजुर कर्मचारी पुरविणे” या कामाची निविदा क्र.१९/०५/२०१८-१९ नुसार ठेकेदार “मे.शुभम उद्योग ” यांना दिनांक २०/०९/२०१९ रोजी कामाचा आदेश देणेत आला आहे. सदर कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दिनांक १९/०९/२०२० पर्यंत आहे. सदर कामात चिखली, जाधववाडी, कुदळवाडी, कृष्णानगर, मोरेवस्ती, चिखली गावठाण, रुपीनगर, तळवडे गावठाण, त्रिवेणीनगर, शरदनगर, सुदर्शननगर, नेवाळेवस्ती, पाटीलनगर, निगडी, यमुनानगर, से.२२ ओटास्कीम, इ. परिसरामध्ये पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व्ह ऑपरेशनसाठी मजुर कर्मचारी पुरविणे या कामाचा समावेश आहे. या कामास मुळ प्रशासकिय मान्यता र.रु.४४,००,०००/- एवढी आहे.सदर कामाची मूळ निविदा र.रु.२७,९५,९४६/- इतकी असून ठेकेदाराचा दर ०.६%

जास्त दराने म्हणजेच र.रु.२८,१२,७२२/- इतकी स्वीकृत करून मा. स्थायी समिती ठराव क्र.५७२३ दि. १८/०९/२०१९ मान्यता मिळालेली आहे. सदर काम ९५% पूर्ण झालेले आहे. अशा प्रकारच्या कामाची निविदा प्रक्रिया जानेवारी २०२० मध्ये राबवलेली असून पुढील कार्यवाही चालू असताना या दरम्यान कोरोना विषाणूच्या (Covid-19) साथीच्या रोगामुळे संपूर्ण भारत देशात Lockdown घोषित झाल्यामुळे व तांत्रिक अडचण असल्यामुळे पुढील निविदा कार्यवाही थांबलेली आहे. सद्यस्थितीत चालू असलेल्या वर उल्लेख केलेल्या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी चालू काम सुधारित करण्याची आवश्यकता असून नवीन कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, सदर काम चालू ठेवण्यासाठी या कामासाठी सुधारित खर्च र.रु.७४,६१,५८१/- इतकी येत आहे. त्यामधून मूळ खर्चाच्या मान्यतेची र.रु.२८,१२,७२२/- वजा जाता येणा-या वाढीव खर्च र.रु.४६,४८,८५९/-. इतका होणार आहे. तसेच या कामासाठी येणा-या वाढीव खर्चास व अंतर्गत वाढ घट करण्याच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची खालीलप्रमाणे मान्यता घेणे आवश्यक आहे.

**वाढ घट तक्ता**

| अ क्र | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र./ अनु क्र | सन २०२०-२ चा मूळ अंदाज र.रु. | वाढ करावयाची तरतूद र.रु. | घट करावयाचं तरतूद र.रु. | सन २०२०-२१ साठी एकूण आवश्यक तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **लेखाशिर्ष -**<br>**फ क्षेत्रीय कार्यालय पाणीपुरवठा विभाग महसुली खर्च**<br>"फ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत कृष्णानगर व इतर ठिकाणी व्हॉल्व्ह ऑपरेशनकरीता मजुः कर्मचारी पुरविणे" | **८६८/ १४** | **०** | **४६,४८,८५९** | **०** | **४६,४८,८५९** |
| २ | "फ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत कृष्णानगर व इतर ठिकाणी व्हॉल्व्ह ऑपरेशनकरीता मजुः कर्मचारी पुरविणे" | **८६९/ २६** | **६८,१२,०००** | **०** | **४६,४८,८५९** | **२१,६३,१४१** |
| | **एकूण** | | **६८,१२,०००** | **४६,४८,८५९** | **४६,४८,८५९** | **६८,१२,०००** |

सदर कामासाठी येणारा वाढीव खर्च र.रु.**४६,४८,८५९**/- **(**अक्षरी र.रु.सेहेचाळीस लाख अठ्ठेचाळीस हजार आठशे एकोणसाठ फक्त**)** व अंतर्गत वाढ घट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०८८ | विषय क्रमांक – २
दिनांक – २०/०५/२०२० | विभाग – प्रशासन
सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/०१/कावि/५१५/२०२०, दि.०८/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु (COVID-19) संसर्गाचा धोका निर्माण झाला असून सदर आजाराचा प्रादुर्भाव रोखणे तसेच सदर आजाराचा संसर्ग झालेल्यानागरीकांना (रुग्णांना) जास्तीत जास्त मदत महापालिकेच्या वतीने पोहोचवण्याच्या दृष्टीने महापालिका स्तरावर

अनेक तातडीच्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरीकांना वेळेत मदत देणेकामी महापालिकेतील जास्तीत जास्त तज्ञ अधिकारी/ कर्मचारी उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवेमध्ये डॉक्टर्स व पॅरामेडीकल कर्मचारी यांची संख्या कमी आहे. सध्याचे कोरोना विषाणुच्या पार्श्वभूमीवर तातडीने वैद्यकीय अधिकारी व इतर पदांची भरती करणे शक्य नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतून डॉ.गंभीर वीणादेवी संजीव, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी ह्या दिनांक ३१/०३/२०२० रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या आहेत. डॉ.गंभीर ह्या तालेरा रुग्णालय चिंचवड या ठिकाणी रुग्णालय प्रमुख म्हणून कार्यरत होत्या. कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखने व त्यावर तातडीने उपाय योजना करण्यासंदर्भात डॉ.गंभीर, सेवानिवृत्त ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा सेवानिवृत्तीनंतर देखिल आवश्यक असल्याने त्यांना आदेश क्र.प्रशासन/१/कावि/४६२/२०२० दिनांक ०१/०४/२०२० अन्वये आदेशाचे दिनांका पासून ०६ महिने कालावधीकरीता शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेबर, २०१६ मधील अटी व शर्तीचे अधिन राहून व मासिक पारिश्रमिकाचे निश्चित होणा-या रकमेवर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचे नियुक्तीस व त्या अनुषंगाने त्यांना देणेत येणारे मासिक पारिश्रमिकाचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०८९ | विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/०५/२०२० | विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे पत्र क्र.मातंवि/११/कावि/७५/२०२०,दि.०८/०५/२०२०

विषय – सोशल मिडीया – पेड फेसबुक द्वारे कोरोना प्रातिबंधात्मक उपाययोजना विषयक माहिती नागरिकांना देणेबाबत.

विषय क्र.३ चा विचार दि.०३/०६/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९० | विषय क्रमांक – ४

दिनांक – २०/०५/२०२० | विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/१९२/२०२०, दि.०४/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी जिजामाता रुग्णालयाच्या नवीन इमारतीमध्ये कोरोना आयसोलेशन वॉर्ड व आय सी यु वार्डकरिता आवश्यक साहित्य पडदे व आय सी यु कंपार्टमेंट थेट पद्धतीने खरेदी करणेकामी येणा-या रुपये 5,63,231/- (अक्षरी र.रु.पाच लाख त्रेसष्ट हजार दोनशे एकतीस फक्त) चे खर्चास महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण 5(2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता व मे.स्टार फॅब्रिक्स, निगडी यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७०९१ विषय क्रमांक – ५
दिनांक – २०/०५/२०२० विभाग – प्राथमिक शिक्षण
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.शिक्षण/१०/कावि/८८/२०२०, दि.१३/०५/२०२०

विषय – प्राथमिक शिक्षण विभागातील आणि प्राथमिक शाळांतील प्रिटर व संगणक यंत्रणा देखभाल दुरूस्तीसाठी मे.एस.बी.इलेक्ट्रॉनिक्स, पुणे यांची दोन वर्ष नियुक्ती करणेबाबत.

विषय क्र.५ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९२ विषय क्रमांक – ६
दिनांक – २०/०५/२०२० विभाग – कायदा
सुचक – मा.भामाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कास/६/कावि/१४८/२०२०, दि.३०/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.झेलिकॅन इन्फोटेक प्रा.लि यांचेकडील लिटिगेशन मॅनजमेंट सॉफ्टवेअर मध्ये भारतातील ६००० पेक्षा अधिक कोर्टाची तसेच विविध फर्मस, तसेच ना.सुप्रीम कोर्ट, ना.उच्च न्यायालय, मा.जिल्हा न्यायालये, ग्राहक न्यायालये, ट्रिब्युन्ल्स कोर्ट इत्यादी न्यायालयीन कामकाजाची माहिती अतिरिक्त प्रतिज्ञापज्ञ सादर करणे, ऑर्डर्स इत्यादी तसेच सर्व न्यायालयातील रोजच्या रोज झालेल्या कोर्ट केसेची माहिती मोबाईल ऍपवरही तात्काळ उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे सदरचे सॉफ्टवेअर मध्ये कोर्टाकडील विविध नोटीस यांची माहिती त्वरीत उपलब्ध होणार आहे. तसेच कोर्ट केसेसच्या खर्चाची माहिती यामध्ये ठेवता येणार आहे. मे.झेलिकॅन इन्फोटेक प्रा.लि यांचेकडील सॉफ्टवेअर प्रथमतः १ वर्ष कालावधीसाठी थेट पद्धतीने खरेदीकरणेस व त्यासाठी येणा-या र.रू.४१,३००/- (जी.एस.टी.सह) खर्चास तसेच त्याची उपयुक्ता तपासुन पुढील कालावधीसाठी अपडेशन करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९३ विषय क्रमांक – ७
दिनांक – २०/०५/२०२० विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/३/कावि/७२/२०२०, दि.१३/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे क, ड व ई क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरातील मैला शुध्दीकरण केंद्रामधील स्लजची वाहतूक करणे हे काम निविदा क्र.HO/ENV/3/1/2017-18 नुसार मे.शुभम उद्योग यांना देण्यात आलेले आहे. ठेकेदार यांनी सदर काम दिनांक १६/११/२०१७ रोजीचे कार्यारंभ आदेशानुसार चालू केले असून आज मितीस जवळ जवळ ९९% काम पूर्ण केले आहे. सदर कामांतर्गत पिं.चिं.म.न.पा.मधील क, ड व ई क्षेत्रिय कार्यालयाचे परिसरातील मैला शुद्धीकरण केंद्रामधील स्लज मैलाशुध्दीकरण केंद्रातून बाहेर नेणे आरोग्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक असते. तसेच सदर कामात क, ड व ई प्रभागातील दापोडी, कासारवाडी, सांगवी, पिंपळे निलख, च-होली येथील मैलाशुध्दीकरण केंद्रातील स्लजची मोशी कचरा डेपो पर्यंत वाहतुक करणे या कामाचा समावेश आहे. या कामास मुळ प्रशासकीय मान्यता र.रु.१,५०,००,०००/- आहे. सदर कामास र.रू.८३,९८,४५४/- या खर्चास मा.

स्थायी समिती ठराव क्र.१२६४ दि.०८/११/२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे. अश्या प्रकारच्या कामाची निविदा प्रक्रिया मे २०२० मध्ये राबवली असून पुढील कार्यवाही चालू असताना या दरम्यान कोरोना विषाणूच्या (Covid-19) साथीच्या रोगामुळे संपूर्ण भारत देशात Lockdown घोषित झाल्यामुळे व तांत्रिक अडचण असल्यामुळे पुढील निविदा कार्यवाही थांबलेली आहे. त्याचप्रमाणे अ, ब व फ क्षेत्रिय कार्यालयाचे परिसरातील मैलाशुद्धीकरण केंद्रामधील स्लजची वाहतूक करणे हे काम अंतिम करणेत आले आहे. सदर कामांतर्गत रावेत, आकुर्डी, चिंचवड, भाटनगर, व चिखली या मैलाशुद्धीकरण केंद्राचा समावेश होता. त्यामुळे सदर मैला शुध्दीकरण केंद्रामधील स्लजची वाहतूकचे काम बंद आहे. त्यामुळे म.न .पा हद्दीतील नागरी लोकवस्ती असलेल्या मैलाशुध्दीकरण केंद्रामधील स्लज मोशी कचरा डेपो येथे नेणे आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून वर उल्लेख केलेल्या प्रभागातील मैलाशुध्दीकरण केंद्रातील स्लजची मोशी कचरा डेपो पर्यंत वाहतुक करण्यासाठी चालू काम सुधारित करण्याची आवश्यकता असून नवीन कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत ३० जुलै २०२० पर्यंत सदर काम चालू ठेवण्यासाठी या कामासाठी सुधारित खर्च र.रु.१,००,५१,२११/- इतकी येत आहे. त्यामधून मुळ खर्चाच्या मान्यतेची र.रु ८३,९८,४५४/- वजा जाता येणा-या वाढीव खर्च र रु.१६,५२,७५७/- इतका होणार आहे. सदरचे काम यापूर्वीच्या मंजूर निविदा दराने [(७.२५%)कमी] करणे शक्य आहे. तसेच या कामासाठी येणा-या वाढीव खर्चास व अंतर्गत वाढ घट करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची खालील प्रमाणे मान्यता घेणे आवश्यक आहे.

**वाढ घट तक्ता**

| अ.क्र | उपलेखाशीर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र./ अनु. क्र | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज र.रु. | वाढ करावयाची तरतूद | घट कारावयाची तरतूद र.रु | सन २०२०-२१ साठी एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लेखाशीर्ष<br>पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, भांडवली अक, ड व ई क्षेत्रिय कार्यालयाचे परिसरातील मैला शुद्धीकरण केंद्रामधील स्लजची वाहतूक करणे | ३६३ / १३ | २,००,००० | १४,००,००० | ० | १६,००,००० |
| २ | मनपाच्या मैलाशुद्धीकरण केंद्राच्या परिसरात लॅन्डस्केपिंगची कामे करणे | ३६५ / ५१ | २५,००,००० | ० | १४,००,००० | ११,००,००० |
| | एकूण | | २७,००,००० | १४,००,००० | १४,००,००० | २७,००,००० |

तरी उपरोक्त बाबी विचारात घेता मनपाच्या सर्व प्रभागातील दापोडी, कासारवाडी, सांगवी, पिंपळे निलख, च-होली, रावेत, आकुर्डी, चिंचवड, भाटनगर, व चिखली येथील मैलाशुध्दीकरण केंद्रातील स्लजची मोशी कचरा डेपो पर्यंत वाहतुक करणे या कामाची तातडी व आवश्यकता लक्षात घेता मे.शुभम उद्योग यांचे विषयांकित यापूर्वीची मंजूर निविदा क्र.HO/ENV/3/1/2017-18 चे मुळ निविदा र.रु.८३,९८,४५४/- मध्ये वाढीव कामानुसार होणारी र.रु.१६,५२,७५७/- इतक्या रक्कमेची वाढ लक्षात घेता होणा-या र.रु.१,००,५१,२११/- चे सुधारित खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब सदर कामाच्या व्याप्ती मध्ये वाढ करून चालू कामातून निविदा रक्कमेच्या निविदा मान्य दराने करून घेणेस व त्यानुसार होणारे र.रु.१६,५२,७५७/- चे वाढीव खर्चासह होणा-या र.रु.१,००,५१,२११/-चे सुधारित खर्चास व अंतर्गत वाढ घट करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९४ विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/०५/२०२० विभाग – सुरक्षा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/२३०/२०२०, दि.१३/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचार घेवून –

सुरक्षा विभागामार्फत ई निविदा सुचना क्र.१/२०१६-१७ अन्वये ठेकेदारी पध्दतीने मनपा कार्यक्षेत्रात ट्रॅफीक पोलिसांचे मदतीसाठी १५० ट्रॅफिक वार्डन मदतणीस पुरविण्याचे कामकाज आदेश मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि.यांना आदेश क्र.सुवि/३/कावि/२०५/२०२० दि.२१/०४/२०२० अन्वये देण्यात आलेले आहेत. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरू आहे. सदर निविदेचा कालावधी दि.१५/०५/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. तसेच सद्यस्थितीमध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३, व ४ मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली असून संचारबंदी लागू झाली व त्या अनुषंगाने २२ मार्च २०२० ला जनता करफ्यू व २३ मार्च २०२० पासून लॉकडाऊन लागू असून आज अखेर दि.१७ मे २०२० पर्यंत आहे. कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळेपुणे जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये रेड झोन क्षेत्रात मध्ये येत असल्याने लॉकडाऊन कालावधी वाढण्याची व पुढील कार्यवाहीस वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर निविदेचा कालावधी दि.१५/०५/२०२० रोजी संपुष्ठात येत असल्याने मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि. यांस दिनांक १६/०५/२०२० ते दिनांक १५/०८/२०२० (तीन महिने) या कालावधीकरिता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच कामगार कल्याण अधिकारी यांचे कडील पत्र क्र.काक/३/कावि/ ९६/२०२० दिनांक १३/०२/२०२० अन्वये नविन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.५२५०/- व त्यावर लागू असलेले इतर भत्यासहित अदा करणेस व यापुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्या प्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश व प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामासाठी ३ महिने किंवा नविन निविदा प्रक्रीया अंतिम होऊन कामाचा आदेश देणे यापैकी आधी घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्यापोटी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९५ विषय क्रमांक – ९

दिनांक – २०/०५/२०२० विभाग – सुरक्षा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/२२९/२०२०, दि.१३/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

सुरक्षा विभागामार्फत ई निविदा सुचना क्र.३/२०१६-१७ अन्वये ठेकेदारी पध्दतीने मनपा कार्यक्षेत्रात मनपा शाळांचे सुरक्षेकामी ३१६ रखवालदार मदतणीस पुरविण्याचे कामकाज आदेश मे.सैनिक इंटेलिजन्स सिक्युरीटी सर्व्हीसेस प्रा.लि.यांना आदेश क्र.सुवि/३/कावि/१७२/२०२० दि.२१/०३/२०२० अन्वये देण्यात आलेले आहेत. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरू आहे. सदर निविदेच्या कालावधी दि.१५/०५/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. तसेच सद्यस्थितीमध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३, व ४ मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली असून संचारबंदी लागू झाली व त्या अनुषंगाने २२ मार्च २०२०

ला जनता करफ्यू व २३ मार्च २०२० पासून लॉकडाऊन लागू असून आज अखेर दि.१७ मे २०२० पर्यंत आहे. कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळे पुणे जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये रेड झोन क्षेत्रात मध्ये येत असल्याने लॉकडाऊन कालावधी वाढण्याची व पुढील कार्यवाहीस वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर निविदेचा कालावधी दि.१५/०५/२०२० रोजी संपुष्ठात येत असल्याने मे.सैनिक इंटेलिजन्स अँन्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस प्रा.लि. यांस दिनांक १६/०५/२०२० ते दिनांक १५/०८/२०२० (तीन महिने) या कालावधीकरिता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच कामगार कल्याण अधिकारी यांचे कडील पत्र क्र.काक/३/कावि/९६/२०२० दिनांक १३/०२/२०२० अन्वये नविन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.५२५०/- व त्यावर लागू असलेले इतर भत्यासहित अदा करणेस व यापुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्या प्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश व प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामासाठी ३ महिने किंवा नविन निविदा प्रक्रीया अंतिम होऊन कामाचा आदेश देणे यापैकी आधी घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्यापोटी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९६ विषय क्रमांक – १०
दिनांक – २०/०५/२०२० विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/६३८/२०२०, दि.१४/०५/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९७ विषय क्रमांक – ११
दिनांक – २०/०५/२०२० विभाग – सुरक्षा
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/२२८/२०२०, दि.१३/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

सुरक्षा विभागामार्फत ठेकेदारी पध्दतीने सुरक्षा व्यवस्था या उपक्रमान्वये सुरक्षा व्यवस्था करणेकामी ई निविदा सुचना क्र.२/२०१६-१७ अन्वये ठेकेदारी पध्दतीने मनपा कार्यक्षेत्रातील मनपाचे मिळकतींचे सुरक्षेकामी मे.नॅशनल सिक्युरीटी सर्व्हीसेस यांना आदेश क्र.सुवि/३/कावि/१६९/२०२० दि.१९/०३/२०२० अन्वये एकूण ८७५ रखवालदारांचे मदतनीस पुरविणेचे आदेश देणेत आले आहे. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरू आहे. सदर निविदेच्या कालावधी दि.१५/०५/२०२० रोजी संपुष्टात येत आहे. तसेच सद्यस्थितीमध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३, व ४ मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली असून संचारबंदी लागू झाली व त्या अनुषंगाने २२ मार्च २०२० ला जनता करफ्यू व २३ मार्च २०२० पासून लॉकडाऊन लागू असून आज

अखेर दि.१७ मे २०२० पर्यंत आहे. कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळेपुणे जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये रेड झोन क्षेत्रात मध्ये येत असल्याने लॉकडाऊन कालावधी वाढण्याची व पुढील कार्यवाहीस वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर निविदेचा कालावधी दि.१५/०५/२०२० रोजी संपुष्ठात येत असल्याने मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस यांस दिनांक १६/०५/२०२० ते दिनांक १५/०८/२०२० (तीन महिने) या कालावधीकरिता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच कामगार कल्याण अधिकारी यांचे कडील पत्र क्र.काक/३/कावि/९६/२०२० दिनांक १३/०२/२०२० अन्वये नविन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.५२५०/- व त्यावर लागू असलेले इतर भत्यासहित अदा करणेस व यापुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्या प्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश व प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामासाठी ३ महिने किंवा नविन निविदा प्रक्रीया अंतिम होऊन कामाचा आदेश देणे यापैकी आधी घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्यापोटी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९८ विषय क्रमांक – १२

दिनांक – २०/०५/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/५/कावि/६०७/२०२०, दि.१४/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय आयुर्विज्ञान परिषद, दिल्ली यांच्या किमान मार्गदर्शक मानंकानुसार **[MSR 50]** प्रमाणे पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात नीति समिती आवश्यक आहे. नीति समितीत विविध विभागांचे विभागप्रमुख, तज्ञ डॉक्टर्स, वकील, नीति समिती अध्यक्ष, औषधशास्त्र तज्ञ, सामाजिक शास्त्रज्ञ इ. सर्व अभ्यागतांची उपस्थिती आवश्यक तथा बंधनकारक असते. मा.महासंचालक, आरोग्य सेवा, केंद्रीय औषध मानंक नियंत्रण संस्था, नवी दिल्ली, यांचेकडील नोंदणी क्रमांक ECR/1236/ Inst/MH/2019, दिनांक ०४ जुलै, २०१९, अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृतीरुग्णालय अंतर्गत पदव्युत्तर संस्थेच्या नीति समितीस परवानगी मिळालेली आहे. नीति समितीत १० सदस्यांची नेमणूक करण्यात आली असून केंद्र शासनाच्या मानंकानुसार किमान ५ सदस्य बाहेरील आहेत. नजीकच्या भविष्यकाळात यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात विविध कंपन्यांनी प्रायोजित केलेले अथवा सरकारी संस्थांचे संशोधन/शोध प्रकल्प राबविण्यात येतील, पदव्युत्तर संस्थेत काम करणारे प्राध्यापक त्यांच्या बढतीकरिता विविध संशोधन प्रकल्प हाती घेतील. वर नमूद केलेले सर्व शोध प्रकल्पांचे काम सुरू करण्यापूर्वी व शोधनिबंध वैद्यकीय नियतकालिकेत प्रसिध्द करण्यापूर्वी नीति समितीची परवानगी घेणे आवश्यक असते. वरील सर्व विषय नीति समितीच्या बैठकीत सर्व सदस्यांसमोर सादर करणे आवश्यक असते. आजपर्यंत नीति समितीच्या दोन बैठका पार पडल्या आहेत. भविष्यकाळात बैठकांची संख्या वर्षातून ५ ते ६ वेळा होऊ शकते. भविष्यकाळात यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात राबविण्यात येणा-या विविध संशोधन/शोध प्रकल्पांतून महापालिकेस आरोग्य संशोधन प्रकल्प प्रक्रीया सुरू करण्यासाठी उपयोग होऊन, मनपाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याबरोबर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावलौकीकात भर पडेल. त्या अनुषंगाने नीति समितीच्या सभेस उपस्थित राहणा-या सदस्यांना मानधन व प्रवासखर्च देणे आवश्यक असल्याने, नीति समिती अध्यक्ष व सचिव यांना प्रत्येक सभेसाठी र.रू.३,०००/- (अक्षरी र. रू. तीन हजार फक्त) व इतर सदस्य यांना प्रत्येक सभेसाठी र.रू.१,५००/- (अक्षरी र. रू. एक

हजार पाचशे फक्त) याप्रमाणे मानधन तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक- ०३ मार्च, २०१० नमुद केले नुसार किलोमीटर भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४१४(१) आणि (२) दिनांक ०४ डिसेंबर, १९९९ अन्वये नमुद केले आहे. त्याप्रमाणे म.न.पा. हद्दीबाहेर वास्तव्यास असणा-या नीति समितीच्या सदस्यास प्रत्येक सभेसाठी र. रू.९/- (अक्षरी र. रू. नऊ फक्त) प्रती किलोमीटर दर याप्रमाणे प्रवासखर्च देणे आवश्यक आहे. सबब, उपरोक्त प्रमाणे खर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९९ विषय क्रमांक – १३

दिनांक – २०/०५/२०२०

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अनुराधा गोफणे, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव –

मा.अनुराधा गोफणे, मा.निकिता कदम यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्रमांक २६, दि.१४/०५/२०२० नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालवाडयांमधील मुलांना प्राथमिक शिक्षण विभागामार्फत विविध प्रकारची बौध्दिक खेळणी देणे (कपाटासहीत) तसेच याबाबतची संपूर्ण प्रशासकीय कार्यवाही व खेळणी वाटप प्राथमिक शिक्षण विभागामार्फत करणेस तसेच खरेदीकामीची संपूर्ण प्रक्रीया मध्यवर्ती भांडार विभाग व साहित्यांची तांत्रिक तपासणी आय.टी.आय विभागामार्फत करणेत येवून याकामी आवश्यक असणारी तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बालकल्याण योजनेअंतर्गत असणा-या मदर तेरेसा - शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील / प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगिण विकासात्मक योजना या उपलेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेबाबत मा.नगरसदस्या यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषय प्रशानाने तपासून नियमाधीन प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१०० विषय क्रमांक – १४

दिनांक – २०/०५/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मभां/५/कावि/४९८/२०२०, दि.१४/०५/२०२०

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या वैद्यकिय विभागाने कोरोना (Covid-19) या साथरोगावरील उपचारासाठी मागणी केलेनुसार विविध रुग्णालये / दवाखाने यांचेसाठी आवश्यक छपाई साहित्य तातडीने छपाई करुन पुरवठा करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम 63 (6) व कलम 66 (3) (क) नुसार अल्पमुदत जाहिर सुचना क्र.01/2020-21 अन्वये मागविलेल्या दरपत्रकांमध्ये मे.आनंद एंटरप्रायजेस, चिंचवड यांनी दर कमी करुन फेरसादर केलेले दरपत्रक एकूण र.रु.8,64,750/- लघुत्तम प्राप्त झाले असुन सदरचे दरपत्रक स्विकृत करण्यात आलेले असुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला आहे. त्यानुसार छपाई साहित्य छपाई करणेकामी महानगरपालिका अधिनियम 66 (3) (क) नुसार कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता व होणा-या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१०१ विषय क्रमांक – १५

दिनांक – २०/०५/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/९/कावि/१४२/२०२०, दि.१५/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ व ८/२०१७-१८ प्रसिध्द करुन म.न.पा.चे "अ", "ब" "क", "ड", "इ", "फ" "ग" व "ह" क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाई करणेकामी किमान वेतन दराने कामगार उपलब्ध करणे याकामासाठी २ वर्ष कालावधीसाठी किमान वेतनावरील सेवा शुल्कावर निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार ८ क्षेत्रिय कार्यालयाकडे किमान वेतन दरानुसार ७ संस्थांमार्फत १५२९ सफाई कामगार पुरविण्यात आलेले आहे. या ७ संस्थापैकी ५ संस्थांचे कामाची मुदत दिनांक २६/१२/२०१९ रोजी संपुष्टात येत असलेने सदर १ ते ५ या संस्थांना दिनांक २६/१२/२०१९ ते दि. २५/३/२०२० पर्यत व ६ व ७ या संस्थांना दि. ३१/१२/२०१९ ते दि. ३०/३/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आली होती. सदर संस्थांची मुदत अनुक्रमे दि.२५/३/२०२० व दि.३०/३/२०२० रोजी संपुष्टात येत असलेने व यांत्रिक पध्दतीने रस्ते साफसफाई कामाची निविदा प्रक्रिया अंतिम होण्याकरीता आणखी अंदाजे ६ महिने कालावधी लागणार असलेने सदर कामास ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देवून याकामी येणा-या र.रू.१७,५०,४१,१६६/- (अक्षरी र.रु.सतरा कोटी, पन्नास लाख, एक्केचाळीस हजार एकशे सहासष्ट फक्त) इतके अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता तसेच संबंधीतां बरोबर ६ महिने कालावधीचा करारनामा करून घेणे तसेच त्यांना कामाचे आदेश देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामासाठी निविदा प्रक्रिया लवकरात लवकर अंतिम करावी तरी सदर कामास ६ महिने किंवा नवीन निविदा प्रक्रीया अंतिम होऊन कामाचा आदेश देणे यापैकी आधी घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व येणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७१०२ विषय क्रमांक – १६

दिनांक – २०/०५/२०२०

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राहूल कलाटे

संदर्भ – मा.शितल शिंदे मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव –

कोविड-१९ कोरोना लकडाऊनच्या काळात अतिक्रमण विभागामार्फत करण्यात आलेल्या कारवाईमध्ये उचलण्यात आलेल्या गाड्यांबाबत मानवतेच्या दृष्टीकोनातून खालील अल्प दंड आकारून सदर गाड्या सोडणेस मान्यता देणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | हातगाडी | दंड र.रू.१०००/- |
| २) | थ्री व्हिलर टेम्पो | दंड र.रू.२०००/- |
| ३) | चारचाकी वाहन | दंड र.रू.३०००/- |

सदर दंड आकारणेचे दर दि.३१/०५/२०२० पर्यंतच लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१०३ विषय क्रमांक – १७

दिनांक – २०/०५/२०२०

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

नवनगर शिक्षण मंडळ श्रीकृष्णनगर, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे ४११ ०३५ यांचे शाळेची इमारत धोकादायक झाली असलेने शाळेला महापालिकेने नोटीस बजावली आहे. त्यामुळे या संस्थेला त्यांची शाळा इतरत्र स्थलांतरीत करणे आवश्यक असलेने सदर संस्थेस, सेक्टर २३ निगडी येथील महापालिकेच्या किर्ती विद्यांलयाचे इमारतीमधील दुसरा मजला, नगररचना विभाग निर्धारीत करेल त्या भाडेदराने एक शैक्षणिक वर्षाकरिता भाड्याने देण्यास मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१०४ विषय क्रमांक – १८

दिनांक – २०/०५/२०२०

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.सुवर्णा बुर्डे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिं.चिं.म.न.पा. हद्दीताल अनेक ठिकाणी मैलाशुध्दीकरण केंद्राची गरज आहे. तरी अनेक ठिकाणी अशुध्द पाण्यावर प्रक्रिया न करता शहरातील नदी मध्ये अशुध्द पाणी जाते व नदी मध्ये प्रदुषण वाढत आहे. पिं.चिं.मनपा हद्दीतील नियोजित मैलाशुध्दीकरण केंद्राचा SURVEY करून मेलाशुध्दीकरण केंद्र चे DPR तयार करणे व निविदा काढणेकामी अनुभवी सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. सदर कामाकरिता जलनिस्राण विभागात सल्लागार नेमणूक करणे आवश्यक आहे व त्यांना नियमानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तरी वरील विषयांकित कामाकरिता M/S. CV PATIL & ASSOCIATES, WARJE यांची पिं.चिं.म.न.पा. मधील जलनिस्सारण व पर्यावरण विभागात सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व त्यांना पिं.चिं.मनपा नियमानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१०५ विषय क्रमांक – १९

दिनांक – २०/०५/२०२०

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिराचे नुतनीकरणाचे काम निविदा नोटीस क्र.५०/५/२०१७-१८ अन्वये मे.देव कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत करण्यात आले आहे. सद्यस्थितीत काम सुमारे ९९% पूर्ण करण्यात आलेले आहे. आचार्य अत्रे रंगमंदिराचे नुतनीकरणाचे कामाच्या अंदाजपत्रकात Acoustic ceiling विषयी बाबींचा समावेश करणेत आलेला होता. परंतू प्रत्यक्ष काम करतांना जागेवरील रंगमंदिरातील परिस्थितीनुसार आर्किटेक्ट यांनी Acoustic ceiling विषयी नविन चालू पध्दतीनुसार काम करण्याचे सुचविल्यामुळे अंदाजपत्रकातील अंर्तभूत बाबींच्या दरात तफावत निर्माण झालेली आहे. त्यामुळे प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिराचे नुतनीकरणाचे उर्वरीत कामे करणे या कामात र.रू.४५,००,०००/-इतका वाढीव खर्च झालेला आहे. सदरचे वाढीव काम केल्याने मुळ निविदा रक्कमेच्या १०.००% पर्यंतच झाल्याने तसेच सदर कामास

प्रशासकिय मान्यता र.रू.१०.०० कोटी असल्याने वाढीव खर्चास सुधारित मान्यता न घेता चालू कामातूनच करणे योग्य होणार आहे.तरी र.रू.४५,००,०००/-(अक्षरी र.रू.पंचेचाळीस लाख फक्त)चे वाढीव खर्चास कोर्योत्तर मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१०६ विषय क्रमांक – २०

दिनांक – २०/०५/२०२०

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८८/३/२०१८-१९ अन्वये कासारवाडी जलतरण तलावास संरक्षण भिंत बांधणे व रस्ता विकसित करणेकामी मे.यशकिर्ती डेव्हलपर्स अन्ड कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.७४,६२,३९१/- (अक्षरी र.रू.चौ-याहत्तर लाख बासष्ठ हजार तीनशे एक्यान्नव फक्त) मधून जलतरण तलावाच्या सिमा भिंतीच्या दुरूस्तीचे र.रू.७,४१,०००/- तसेच रॉयलटी व मटेरील टेस्टींग चार्जेस वगळून ठेकेदाराकडून र.रू.६६,२६,५७१/- पेक्षा २१.९९% कमी म्हणजेच र.रू.५२,६३,२४८/- (अक्षरी र.रू.बावन्न लाख त्रेसष्ठ हजार दोनशे आठ्ठेचाळीस फक्त) पर्यंतकाम करूण घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राटी कालावाधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१०७ विषय क्रमांक – २१

दिनांक – २०/०५/२०२०

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राहूल कलाटे

संदर्भ – मा.शितल शिंदे, मा.राहूल कलाटे यांचा प्रस्ताव –

ड क्षेत्रिय विद्युत विभागाचे आस्थापनेवरील प्रभाग क्र.२५ परिसरातील रस्त्यावरील दिवाबत्ती देखभाल दुरूस्ती करणेकामी नियुक्त वायरमन कर्मचारी श्रीभोसले डी.डी. दि.३०/०४/२०२० रोजी सेवानिवृत्त झाले असून दुसरे कर्मचारी श्रीजाधव आर.डी. हे दि.३१/०५/२०२० रोजी सेवानिवृत्त होत आहे त्यामुळे दि.०१/०६/२०२० पासून प्रभाग क्र.२५ मधील रस्त्यावरील दिव्याबत्तीचे देखभाल दुरूस्ती करणेकामी मनपाचे वतीने वायरमन कर्मचारी उपलब्ध होणार नाही याबाबत मनपाचे विद्युत मुख्य कार्यालयाने सदर कर्मचारी ठेकेदारी पध्दतीने नेमणूक करणे बाबत कळविले आहे त्यानुसार सदर कर्मचारी नेमणूकीबाबतचा अंर्तभाव सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकात करणेत आलेला आहे. तथापि सदर कामासाठी नविन निविदा प्रक्रिया होणेस विलंब होणार आहे त्यामुळे प्रभाग क्र.२५ मधील रस्त्यावरील दिवाबत्तीचे देखभाल दुरूस्ती करणेस अडथळा निर्माण होणार आहे. त्यामुळे येथे तात्पुरत्या स्वरूपात कर्मचारी नियुक्ती करणे आवश्यक आहे. सद्यास्थितीत ड क्षेत्रीय विद्युत कार्यालयांतर्गत निविदा नोटिस क्र.४/४/२०१९-२०२० अन्वये मे.शुभम इलेक्ट्रीकल्स अन्ड एलेव्हेटर्स या एजन्सीला सन २०१८-२०१९ करिता ड क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील उद्यानातील

विद्युत यंत्राची देखभाल दुरूस्ती करणे या कामाचा आदेश क्र.डक्षे/३/कावि/३४/२०२० दि.०७/०२/२०२० अन्वये देणेत आले आहे. सदर कामाची निविदा र.रू.७,१३,७६६/-(अक्षरी र.रू.सात लाख तेरा हजार सातशे सहासष्ठ फक्त) असून निविदा दर २६.१५% कमी असा असून कामाची मुदत १२ महिने आहे. सदर कामावर आज अखेरचा खर्च निरंक असून या कामामध्ये तात्पुरत्या स्वरूपात २ कर्मचारी नेमणे आवश्यक आहे त्यासाठी निविदेतील दरा प्रमाणे ६ महिन्या करिता कर्मचारी नियुक्ती करणेकरिता र.रू.२,७४,२३६/-(अक्षरी र.रू.दोन लाख चौ-याहत्तर हजार दोनशे छत्तीस फक्त) इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. सदर कामास र.रू.१०,००,०००/-इतकी प्रशासकिय मान्यता आहे. सबब निविदा नोटीस क्र.४/४/२०१९-२०२० अन्वयचे काम सन २०१८-२०१९ करिता ड क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील उद्यानातील विद्युत यंत्राची देखभाल दुरूस्ती करणेच्या कामास वाढीव र.रू.२,७४,२३६/-(अक्षरी र.रू.दोन लाख चौ-याहत्तर हजार दोनशे छत्तीस फक्त) तसेच सुधारित र.रू.९,८८,००२/-(अक्षरी र.रू.नऊ लाख अठ्याऐंशी हजार दोन फक्त)चे खर्चास व मे.शुभम इलेक्ट्रीकल्स अन्ड एलेव्हेटर्स यांना सुधारित करारनामा करून रितसर अनामत रक्कम घेवून काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१०८ विषय क्रमांक – २२

दिनांक – २०/०५/२०२०

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.आरती चोंधे, मा.झामाबाई बारणे यांचा प्रस्ताव –

विविध संस्थांकडून, चॅरिटीमधून अन्नधान्याचे कीट महापालिकेस प्राप्त झाले आहे. सदरचे कीट दिव्यांग, कुष्ठरूग्ण, शाहिर व साहित्यीक ग्रुप व इतर १० जणांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/५३७/२०२०
दिनांक – २२/०५/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**(विषय क्रमांक १० चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ जलनि:सारण मुख्यालय
क्र.जनि/२/कावि/६३८/२०२०
दि.२८/०५/२०२०

प्रपत्र अ ( १ ते १ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| १ | मे. भोलेशंकर एंटरप्रायजेस | १५/१०/२०१८-१९ | ड प्रभागातील संप व पंपिंग स्टेशन (पिं. सौदागर, वाकड) मधील स्थापत्य विषयक दुरुस्ती कामे करणे. | ०५-०९-१९ | जनि/२/कावि/१०२०/२०१९ | १९-११-१९ | Rs. १२,५५,२१३ | Rs. १२,५५,१७१ | ४२.०० | ० | २२.५६ | % कमी | ९७२०३७ |
| | | एकुण र.रु. | | | | | Rs. १२,५५,२१३ | Rs. १२,५५,१७१ | ४२.०० | ० | | | ९७२०३७ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८